




दैनिक

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

newsaksharaj2021@gmail.com

संपादक : विनोद कैलास गोरे








● वर्ष ३ रे ● अंक २५६ वा ● पाने ४ | बुलडाणा, शुक्रवार, दि.२६ एप्रिल २०२४ | ● RNI NO. : MAHMAR/2022/82056 ● किंमत : ३ रुपये


# मोदींनी एकही आश्वासन पूर्ण केले नाही ; सभेतून शरद पवार बरसले

## राहुरी येथे महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ सभा

## केंद्र सरकारवर हल्लाबोल | विखेंचाही घेतला समाचार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, राहुरी (अ.नगर) :** भाजप सरकारने गेल्या दहावर्षात दिलेली आश्वासने पाळली नाही. महागाई वाढली, शेतकर्यांच्या मालाला भाव मिळत नाही, बेरोजगारी वाढली आहे. विरोधात बोलणार्यांना ईडीचा धाक दाखविला जात आहे. तसेच विरोध केल्यास जेलमध्ये टाकले जात आहे.

मोदी सरकारने गेल्या दहा वर्षात एकही दिलेली आश्वासने पाळली नसल्याने मोदींची गॅरंटी ही टिकाऊ नसल्याचा हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खा. शरद पवार यांनी केला. अहमदनगर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवारी नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ राहुरी येथे सभा झाली. या सभेत ते बोलत होते. यावेळी आमदार प्राजक्त तनपुरे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, माजी आमदार दादाभाऊ कळमकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शशिकांत गाडे, आपचे जिल्हाध्यक्ष आढाव यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शरद पवार म्हणाले, गेल्या दहा वर्षात भाजपा सरकारने देशात काय केले हे त्यांनी सांगितले पाहिजे.

गॅस सिलेंडरला दहा वर्षापूर्वी ४१० रुपये भाव होता आज एक हजाराच्या पुढे आहे. दिलेली आश्वासने पाळली नाहीत. त्यामुळे भाजप सरकारविरोधात मोठ्या प्रमाणात लाट आहे. विरोधात बोलणार्यांविरोधात ईडी, सीबीआयचा



वापर केला. तसेच काहींना जेलमध्ये टाकले. राज्य सहकारी बँक प्रकरणी मलाही ईडीची नोटीस पाठविली. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी शिक्षण व आरोग्य क्षेत्रात चांगले काम केले. त्यांना जेलमध्ये टाकले. सध्याचे सरकार हे हुकूमशाही पद्धतीने काम करत आहे. देशातील हुकूमशाही उलथून टाकणारी ही निवडणूक असून या निवडणूकीत हुकूम शाही सरकारला उलथून टाकल्याशिवाय राहणार नाही असे पवार म्हणाले. नगर जिल्ह्यात ५० वर्ष राजकारण करणाऱ्यांनी जिल्ह्यासाठी काय केले ?असा सवाल उपस्थित करत उमेदवाराच्या आजोबांनी निळवंडे धरणाला विरोध केला होता. असे सांगितले. राज्यात अनेक ठिकाणी मेडिकल कॉलेज झाले परंतु, अहमदनगरमध्ये सरकारी मेडिकल कॉलेज होवू शकले नाही. सत्तेचा गैरवापर करून त्यांनी ती होवू दिली नाही. महाविकास आघाडीचा उमेदवार फाटका असला तरी समोरच्या उमेदवाराला उलथून टाकणार असल्याचा विश्वास पवार यांनी व्यक्त केला.



**अक्षराज : आकाश जयस्वाल**


**दि.२५, माहूर (नांदेड) :**

महाराष्ट्रातील साडे तीन शक्तिपीठापैकी एक माहूर गडावरील रेणुका आईच आजच सुंदर छायाचित्र.

**आईचे आजचे दर्शन माहुर गड जय जगदंब**

# थोडक्यात

## अखेर तहानलेल्या खंडाळ्यासाठी धोम बलकवडीचे पाणी आवर्तन सुरू



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२५,खंडाळा (सातारा) :** खंडाळा तालुक्यातील पुर्व भागातील विहिरींनी तळ गाठल्याने नागरिकांच्या व जनावरांच्या पिण्याचा प्रश्न गंभीर बनला होता.यासाठी तालुक्यातील पुर्व भागातील शेतकरी तसेच सर्व गावच्या सरपंच पदाधिकारी यांनी वेळोवेळी पाण्याची मागणीसाठी प्रशासनाकडे तसेच लोकप्रतिनिधींकडे निवेदने दिली होती.व वारंवार त्यासाठी विविध स्तरांवर पाठपुरावा केला होता.तसेच प्रशासनास आंदोलनाचा इशारा देखील देण्यात आला होता.

तालुक्यातील लोकप्रतिनिधींसह शेतकर्यांनी आमदार मकरंद पाटील यांच्याकडे पाण्यासाठी पाठपुरावा केला होता.यासर्वांच्या प्रयत्नांना आज धोम बलकवडीतून पाणी आवर्तन सोडण्यात आल्याने यश आल्याचे दिसत आहे.

तालुक्यातील पुर्व भागातील अनेक गावामधे तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली होती.तसेच जनावरांसाठी चारा व पिण्यासाठी पाणी प्रश्नाने बळीराजा हवालदिल झाला होता.अशातच आचारसंहिता लागू झाल्याने तालुक्यातील पाणीप्रश्न प्रशासनाकडून किती गंभीरपणे मार्गी लावला जाईल याबाबत नागरिकांच्या मनात संभ्रम निर्माण झाला होता. आज गुरवार दि.२५ रोजी धोम बलकवडी कॅनॉलमधून पाणी सोडण्यात आल्याचे समजताच नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

माघील संपुर्ण वर्षात दरवर्षीच्या तुलनेत अगदीच नगन्य पाऊस झाल्याने खंडाळा तालुक्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झालेली.तीव्र पाणीटंचाई निर्माण होणार हे नक्कीच होते मात्र धोम बलकवडीचे पाणी तालुक्यात फिरल्याने थोडासा दिलासा मिळाला होता.मात्र माघील दोन महिन्यापासून तालुक्यात तीव्र पाणीटंचाई भासू लागली होती. शेतकरी वर्गासह सर्वांनाच या पाणीटंचाईने म ेटाकुटीस आणले होते.

सद्य स्थितीतील पाणीटंचाईचा आढावा घेऊन आमदार मकरंद पाटील व पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी याबाबत वरिष्ठ अधिकारी यांच्याशी चर्चा करुन काल रात्री पाणी सोडण्याबात आदेश दिल्याने आज धोम बलकवडीतून तालेक्यासाठी पाणी सोडण्यात आले.धोम बलकवडी कॅनॉलला पाणी सोडण्यात आल्याने खंडाळा तालुक्यातील पुर्व भागातील जनतेचा तात्पुरता का होईना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटेल असे दिसतेय.

## बनावट रेरा ७ माळ्याच्या आरसीसी बांधकामावर महानगर पालिकेची कारवाई

**अक्षराज : भानुदास गायकवाड**


**दि.२५, डोंबिवली :** डोंबिवली पश्चिम येथील साईलीला चाळी जवळ कुंभारखानपाडा येथील तळ + ७ माळे , बनावट रेरा परवानगी असलेल्या आरसीसी बांधकामावर विभाग ७ /ह डोंबिवली पश्चिम अधीक्षक अरुण पाटील व महापालिकेचे कर्मचारी व कामगार यांच्या सहाय्याने संपूर्ण संपूर्ण निष्कासनाची कारवाई करण्यात आली. दि. ०३/०४/२०२४ पासून दि. २२ /०४/२०२४ पर्यंत महापालिकेच्या ठेकेदाराच्या मनुष्यबळाने इमारतीवरील भाग हाती निष्कासनाची कारवाई करण्यात आली. तसेच २३/०४२०२४ व दि. २४/०४/२०२४ रोजी ठेकेदाराच्या यंत्रसामुग्री (पोकलन मशीन) द्वारे संपूर्ण अनधिकृत इमारत निष्कासन करुन भुई सपाट करण्यात आली.

# राज्यावर अवकाळीचे संकट कायम..!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, बुलडाणा :** राज्यासह देशाच्या हवामानात काही दिवसांपासून मोठा बदल होत आहे. काही ठिकाणी उष्णतेच्या झळा बसत आहेत. तर काही ठिकाणी अवकाळी पाऊस बरसत आहे. हवामान खात्याने राज्यात काही भागात अवकाली पावसाची शक्यता वर्तवली होती.

त्याप्रमाणे काही जिल्ह्याता पावसाने हजेरी लावली आहे. काही जिल्ह्यांमध्ये सोमवारी रात्रीपासून पावसाची रिपरिप सुरु झाली. आणखी दोन दिवस राज्यात अवकाळीचे संकट कायम राहणार असून त्यानंतर अवकाळी पावसाचा जोर ओसरण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. बुलढाणा जिल्ह्यात अवकाळी पाऊस झाला आहे. त्यामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. यवतमाळ जिल्ह्यातील उम



रखेड, मारेगाव, वणी, कळंब, राळेगाव तालुक्यात पावसाच्या सरी कोसळल्या आहेत.

त्यामुळे उकाड्यापासून दिलासा मि ळाला आहे. पुढील दोन ते तीन दिवस दिवस विदर्भ आणि मराठवाड्यात ढगाळ वातावरण असण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. मध्य महाराष्ट्र, पुणे, मुंबई आणि कि नापट्टीच्या भागात ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता आहे. गेल्या आठवड्यात उन्हाचा कडाका वाढला होता.

मात्र, अवकाळी पावसाने उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे. तसेच राज्यात अनक ठिकाणी तापमानात घटनोंदवण्यात आली आहे. विदर्भातील भंडारा जिल्ह्यासह काही जिल्ह्यात मराठवाड्यात आणि काही ठिकाणी विजांच्या गडगडाटासह पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे.

हवामान खात्याने विदर्भासह महाराष्ट्रातील बहुतेक भागांत २५ एप्रिलपर्यंत ढगाळ वातावरण व अवकाळी पावसाचा अंदाज आहे. राज्यात अनेक ठिकाणी ढगाळ वातावरण असल्याचे तापमानात घट झाली आहे. अवकाळी पावसाची जोर

२५ एप्रिलपर्यंत राहण्याचा हवामान खात्याचा अंदाज आहे. पुढील दोन राज्याच्या काही भागात विजांच्या गडगडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. २५ एप्रिलपासून पावसाचा जोर ओसरणार असला तरी २८ एप्रिलपर्यंत ढगाळ वातावरण कायम राहण्याचा हवामान खात्याचा अंदाज आहे. त्यामुळे एप्रिल महिन्यात उन्हाच्या चटक्यापासून दिलासा मिळणार आहे.

# अहमदनगर दक्षिणमध्ये लढत नव्हे, संघर्षच...

## खा. विखे – आ. लंके यांच्यात वैयक्तिक विरोध जास्त

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, अहमदनगर :** नगर दक्षिण लोकसभा म तदारसंघातील यावेळची निवडणूक अत्यंत संघर्षाची होईल, असे एकूण वातावरण आहे. आज ही चूरस वाटत असली, तरी पुढे चालून याचे रुपांतर संघर्षात होण्याची शक्यता जास्त आहे. रिंगणातील दोन्ही प्रमुख उमेदवार हे प्रतिस्पर्धी नसून एकमेकांचे कट्टर विरोधक आहेत. उमेदवारच नव्हे तर त्यांचे कार्यकर्तेही तेवढेच आक्रमक असल्याने ही निवडणूक प्रशासनासाठी देखील पुढे चालून डोके दुखी ठरू शकेल. लोकसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर अहमदनगर मतदारसंघातून भाजपची उमेदवारी खा. डॉ. सुजय विखे यांनाच मिळणार, हे निश्चित होते. डॉ. सुजय विखे यांच्याशिवाय भाजपकडे तेवढा तगडा पर्यायही नव्हता. अंतर्गत धुसफूस असली तरी उमेदवारीच्या मागणीवरून त्यात फार रामायण घडेल अशातील स्थिती नव्हती. झालेही तसेच. माजी मंत्री राम शिंदे यांनी काही काळ उमेदवारीसाठी ताणून धरले असले तरी त्यांच्या मागणीची दखल वरिष्ठांपर्यंत किती घेतली जात होती, याबाबत साशंकता आहे. ते देखील मुळचे भाजपचे असल्याने वेगळा विचार करण्याची शक्यता नव्हती. मात्र विखे यांच्या विरोधात कोण,हा प्रश्न होताच. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर पारनेरचे आमदार निलेश लंके अजित पवार गटात दाखल झाले होते. त्यामुळे या जागेवर दावा असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे कोण उमेदवार असेल, याबाबत उत्सुकता होती. त्यावेळी आ. रोहित पवार, माजी मंत्री प्राजक्त तनपूरे यांच्या नावांची चर्चा झाली. मात्र हे दोघेही फारसे उत्सुक नसल्याचे त्यावेळी वातावरण होते. आमदारकीचा राजीनामा देण्यापूर्वी पारनेरमध्ये लंके विरूद्ध विखे असा सामना रंगलेलाच होता. लंके यांनी विखे यांच्या विरोधात दंड थोपटायचा निर्णय घेतलाच होता. मात्र हे करत असतानाही ते सावध होते. आपली आमदारकी शाबूत ठेऊन त्यांना विखे यांच्या विरोधात लढत द्यायची होती. त्यासाठी त्यांनी आपल्या पत्नीला उमेदवारीसाठी पुढे केले. जेष्ठ नेते शरद पवार यांनी त्यास स्पष्ट नकार दिल्यानंतर आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वेगळा विचार केल्यास अपात्रतेची कारवाई करण्याचा इशारा दिल्यानंतर लंके यांच्यासम ोर पर्याय राहिला नाही. विखे यांनी मात्र आपल्यासमोर उमेदवार लंके हेच असतील,याचा अंदाज बांधून निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी आवश्यक ती तयारी केली. पारनेर तालुक्यात लंके आमदार असताना झालेल्या प्रत्येक प्रकाराचे एक एक पुरावे त्यांनी तयार केल्याचे बोलले जाते. सुपे एमआयडीसी, वाळू प्रकरण, प्रशासनाला दिलेली वागणूक,कोविड काळातील वस्तुस्थिती असे बरेच पुरावे पुढील काळात प्रचारामध्ये समोर आले, तर नवल वाटायला नको. लंके देखील ही निवडणूक सहजपणे घ्यायला तयार नाहीत. जशास तसे,हा त्यांचा बाणा प्रचार काळात उफाळून येण्याची शक्यता अधिक आहे. त्यातून सोशल मीडियावर सुरू असलेले युद्ध प्रत्यक्ष मैदानात यायला वेळ लागणार नाही. लंके आणि विखे या दोन्हीचे कार्यकर्ते तेवढेच आक्रमक आहेत. आतापासूनच टीकेची पातळी हळूहळू खालवायला सुरुवात झाली आहे. यात आरोप प्रत्यारोप आणि टिकेची भाषा जेवढी विकसित होत जाईल, तेवढे वातावरण तापत जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढे नेमके काय वाढून ठेवले असेल,याची चिंता आतापासूनच प्रशासनाला पडली आहे.

**भाजपमध्येही आलबेल नाही...** लोकसभेची उमेदवारी मिळाल्यानंतर खा. डॉ. सुजय विखे यांनी भाजपचे पदाधिकारी, नेते, प्रमुख कार्यकर्ते यांच्यासमोर माफीनामा सादर केला. मात्र त्यानंतरही काहींचे पुरेसे समाधान झालेले दिसत नाही. माजी मंत्री राम शिंदे यांनी विखे यांच्यासोबत उभा दावा घेतल्यानंतरही पक्षाचे काम प्रामाणिकपणे करणार असल्याची ग्वाही दिली. असे असले तरी त्यांचे आणि लंके यांच्यातील मैत्री साशंकता निर्माण करते. कारण या दोघांतील मैत्रीचा मुख्य धागा हा विखे विरोध हाच आहे.

## संपादकीय

### बदलत्या हवामानाचा फटका

बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका बसत आहे. त्यातही कृषी क्षेत्रावर त्याचा जास्तच परिणाम होताना दिसत आहे. सध्या एप्रिल महिना चालू आहे. सर्वत्र कडाक्याचे ऊन जाणवत आहे. सर्वच शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात आहे. विदर्भातील काही भागात तर तापमान ४२ ते ४५ अंश सेल्सिअस नोंदवले जात आहे. तापमान वाढल्याने लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे.

कडाक्याच्या उन्हामुळे लोकांना अनेक आजार होत आहेत. या कडाक्याच्या उन्हात लोकांना चक्कर येणे, हृदय विकाराचा झटका येणे, रक्तदाब वाढणे, शरीरातील पाणी कमी होणे, डोळ्यांचे विकार जडणे, लहान मुलांचा घोळणा फुटणे, उष्माघात होणे असे प्रकार घडतात. उष्माघाताने काहींचा जीवही जाऊ शकतो. मागील वर्षी खारघर मध्ये घडलेली घटना अजूनही ताजीच आहे. मागील वर्षी उष्माघातामुळे महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात १५ श्री सेवेकराना जीव गमवावा लागला होता. कडाक्याच्या उन्हात जास्तीतजास्त पाणी पिण्याचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात आहे. तसेच फळांचा ज्यूस सेवन करण्यास सांगितले जाते. डॉक्टरांकडून दुपारी ११ ते ४ घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला जातो मात्र पोटापाण्यासाठी लोकांना घराबाहेर पडावेच लागते. एकीकडे कडाक्याचे ऊन असताना राज्यातील काही भागात मात्र वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. पुढील काही दिवस राज्यातील काही भागात अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. अवकाळी पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान होते. फळबागा जमीनदोस्त होतात. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो. क्षणात होत्याचे नव्हते होते. वर्षभराच्या मेहनतीवर पाणी पडते. अवकाळी पाऊस झाला की बळीराजाच्या काळजाचा ठोका चुकतो. ऐन उन्हाळ्यात अवकाळी पाऊस पडणे ही गेल्या काही वर्षातील नित्याची बाब झाली आहे.

कडाक्याचे ऊन, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्रीवादळ अशा घटना वर्षभर घडत असतात. महाराष्ट्र हे सह्याद्रीच्या कुशीत वसले आहे. पूर्वी सर्व ऋतूंचे आगमन वेळेवर होत होते. मागील काही वर्षात ऋतुमानात मोठे बदल पाहायला मिळत आहे. ऋतुमानच बदलले आहे. पूर्वी पाऊस फक्त पावसाळ्यातच पडत असे आता वर्षभर कोठेना कोठे पाऊस पडताना दिसतो. पावसाळ्यात दोन दोन महिने पाऊस पडत नाही. कधीकधी दोन दिवस इतका पाऊस पडतो की दोन दिवसात दोन महिन्याची सरासरी भरून काढतो. त्यामुळे कोणत्या ऋतूत कोणते पीक घ्यावे याबाबत शेतकरी संभ्रमात असतो. बदलत्या हवामानामुळे काहींनी शेती करणेच बंद केले आहे. राज्यात मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात जंगलतोड वाढली आहे. कॉंक्रीटीकरण वाढले आहे. शहरे सिमेंटचे जंगले बनली आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे. त्यामुळे वातावरणात बदल होत आहे. वातावरणातील बदलामुळे या घटना घडत आहेत.

निसर्गाच्या या बदलत्या चक्राचा मानवजातीवरच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीवरच परिणाम होत आहे. लोकांनी यातून धडा घेऊन आतापासूनच निसर्ग नियमाने जगणे सुरू करायला हवे. वृक्षतोड थांबवली पाहिजे, जंगलतोड थांबवली पाहिजे. वृक्षलागवड करून ती जगवली पाहिजेत. माणसाने निसर्गावर केलेले आक्रमण थांबवले पाहिजे. जर माणसे निसर्ग नियमाच्या विरुद्ध गेले तर त्याची मोठी किंमत येणाऱ्या पिढीला मोजावी लागेल.

## कुशाग्र बुद्धिमत्ता : आपली अमूल्य संपत्तीच !

जागतिक बौद्धिक संपदा दिवस दरवर्षी २६ एप्रिल रोजी पेटंट, कॉपीराइट आणि ट्रेडमार्कबद्दल जागरुकता वाढवण्यासाठी साजरा केला जातो. जागतिक बौद्धिक संपदा संघटना- डब्ल्यूआईपीओद्वारे सन २००० साली या दिवसाची स्थापना करण्यात आली.

जागतिक बौद्धिक संपदा दिवस आम्हाला कल्पकता आणि सर्जनशीलता साजरे करण्यास मदत करतो, ज्यामुळे आम्हाला आमच्या जगासाठी निर्माते आणि शोधकांनी केलेले योगदान माहिती होतात. या दिनानिमित्त जगभरात अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. याकडे वेगवेगळ्या प्रकारे पाहिले जाते. कारण लोकांमध्ये भिन्न बौद्धिक गुण असतात जे त्यांच्यासाठी महत्त्वाचे असतात. हे कार्यक्रम सर्व प्रकारचे मूळ कार्य प्रदर्शित करतात, जे पुढील पिढीला विचार करण्यास आणि तयार करण्यास प्रेरित करतात. सर्जनशीलता ही अशी शक्ती आहे, जी समाजाच्या आधुनिकीकरण आणि विकासाकडे नेणारी आहे. नवकल्पनांमुळे आपले जीवन सोपे आणि अधिक आरामदायक बनते.

आज जागतिक बौद्धिक संपदा दिन आहे. जसे सोने, दागिने, मालमत्ता ही जशी संपत्ती असते, त्याचप्रमाणे स्वतःची बुद्धिमत्ता हीदेखील संपत्ती म्हणून ओळखली जाते. जागतिक बौद्धिक संपदा दिनानिमित्त वाययचौर्याच्या इतिहासाविषयी काही गोष्टी जाणून घेऊया. वाययचौर्य म्हणजेच प्लॅजेरिझम होय. प्लॅजेरिझम हा शब्द प्रथमतः पहिल्या शतकामध्ये आलेला आढळतो. मूळ लॅटिन असणारा प्लेजिअरिअस हा शब्द आहे. याचा अर्थ अपहरणकर्ता असा होतो. एखाद्याच्या सृजनात्मक कामाचे अपहरण करणे म्हणजे प्लॅजेरिझम होय.

प्लेजिअम म्हणजे चोरी करणे. इंडो-युरोपियन भाषांमध्ये प्लेजचा अर्थ जाळे किंवा सापळा असा होतो. एखाद्याला नकळतपणे जाळ्यात पकडले जाते. या अर्थाने प्लेजिअरिअस हे परिष्कृत रूप बनले गेले आणि तसे करण्याची वहिवाट म्हणून प्लेजिअरिझम ही संज्ञा आली असावी. ग्रीक, लॅटीननंतर नंतर १६०१ साली बेन जॉन्सन या नाटककार-समीक्षकाने साहित्यचोराला उद्देशून प्लेजिअरी हा शब्द उपयोगात आणला. इंग्रजीमध्ये प्लेजिअरिझम ही संज्ञा सन १६२०च्या दरम्यान स्वीकारण्यात आली. सॅम्यूएल जॉन्सनने त्याच्या सन १७५५ साली प्रकाशित झालेल्या शब्दकोशात प्लेजिअरीच्या अ थीफ इन लिटरेचर, वन हू स्टील्स दी थॉट्स ऑर रॉईटिंग्ज ऑफ अनादर, दी क्राईम ऑफ लिटररी थीफ्ट अशा व्याख्या दिल्या आहेत. ऑक्सफर्ड शब्दकोशात लॅटीन प्लेजिअरिअस हा शब्द सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात आल्याचे म्हटले आहे.

**बौद्धिक संपदा म्हणजे काय?**

तर बौद्धिक संपदा- आईपी मनाच्या निर्मितीचा संदर्भ देते, जसे की आविष्कार; साहित्यिक आणि कलात्मक कामे, रचना आणि वाणिज्यमध्ये वापरलेली चिन्हे, नावे आणि प्रतिमा आईपी कायद्यामध्ये संरक्षित आहेत. उदाहरणार्थ, पेटंट, कॉपीराइट आणि ट्रेडमार्क, जे लोकांना त्यांनी जे काही शोध लावले किंवा तयार केले त्यापासून मान्यता किंवा आर्थिक लाभ मिळवण्यास सक्षम करते. नवोन्मेषकांचे हित आणि व्यापक सार्वजनिक हित यांच्यातील योग्य संतुलन साधून, सर्जनशीलता आणि नावीन्यपूर्णता वाढू शकेल अशा वातावरणाला प्रोत्साहन देण्याचे आईपी शासनाचे उद्दिष्ट आहे.

जागतिक बौद्धिक संपदा संघटना ही जागतिक बौद्धिक संपदा दिन स्थापन करण्यासाठी जबाबदार असलेली संस्था आहे. संस्था बौद्धिक संपदा धोरण, सेवा आणि सहकार्यासाठी जागतिक मंच म्हणून काम करते. डब्ल्यूआईपीओ ही १९३ सदस्य राष्ट्रांसह स्व-वित्तपुरवठा करणारी संयुक्त राष्ट्रांची संस्था आहे. नॅशनल अल्जेरियन इंडस्ट्रियल प्रॉपर्टी इन्स्टिट्यूट- आईएनएपीआईच्या महासंचालकांनी जागतिक बौद्धिक संपदा दिवसाची स्थापना सुरू केली. हा दिवस कॉपीराइट, ट्रेडमार्क आणि पेटंटबद्दल जागरूकता निर्माण करतो. हे कायदे आणि नोंदणी आहेत जे निर्माते आणि नवोदितांच्या मूळ कार्याचे संरक्षण करतात.

यामध्ये लेखक, कलाकार, शोधक आणि ब्रँड यांचा समावेश असू शकतो जे निर्मात्यांना त्यांच्या कामाचे अधिकार आहेत, याची खात्री करण्यात मदत करतात. बौद्धिक संपदा नियम अधिक विकासास प्रोत्साहन देतात. मूळ कामाची पायरसी रोखण्यासाठी, निर्मात्यांना त्यांच्या आविष्कारांची पूर्ण मालकी असावी या कल्पनेला चालना देण्यासाठी बौद्धिक संपदा नियम असणे महत्त्वाचे आहे. बौद्धिक मालमत्तेची चोरी युनायटेड स्टेट्समध्ये दरवर्षी सुमारे २२५ अब्ज ते ६०० अब्ज खर्च करते. हे नियम निर्माते आणि देशाचे आर्थिक नुकसान होण्यापासून संरक्षण करण्यात मदत करतात.

**!! जागतिक बौद्धिक मालमत्ता दिनाच्या सर्व भावाबहिणींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**

**– संकलन व सुलेखन –**
**श्री. कृष्णकुमार निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली**
**फक्त मधुभाष- ७७७५०४१०८६.**

## लोकसंख्या शिक्षण काळाची गरज

जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशात भारताने चीनला मागील वर्षीच मागे सारून अव्वल स्थान प्राप्त केले. तज्ज्ञांनी २०२३ साली भारत चीनला मागे सारून सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनेल असा अंदाज वर्तवला होता. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंट या जागतिक लोकसंख्येचा अभ्यास करणाऱ्या संयुक्त राष्ट्र संघाच्या संस्थेने त्याची पुष्टी केली होती. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंटने आता जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार आज भारताची लोकसंख्या १४४ कोटींच्या घरात पोहचली आहे. मागील वर्षी भारताची लोकसंख्या १,४२८.६ दशलक्ष आहे तर चीनची लोकसंख्या १,४२५.७ दशलक्ष इतकी आहे म्हणजेच दोन्ही देशांच्या लोकसंख्येमध्ये २.९ दशलक्ष इतका फरक आहे. अवघ्या एका वर्षात भारताची लोकसंख्या २ कोटींनी वाढली आहे. चीनच्या लोकसंख्या वाढीचा वेग घटत आहे तर भारताचा लोकसंख्या वाढीचा वेग वाढत आहे. हाच वेग कायम राहिला तर लवकरच भारताची लोकसंख्या दीडशे कोटी होईल. आज भारताची लोकसंख्या १४४ कोटींच्या पुढे गेली आहे. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपली लोकसंख्या तीस कोटी होती याचाच अर्थ मागील पंच्याहत्तर वर्षात आपल्या देशातील लोकसंख्या ११४ कोटींनी वाढली. आज आपण लोकसंख्येत जगात पहिल्या क्रमांकावर पोहचलो आहोत अर्थात ही काही भूषणावह बाब नाही. देशाच्या सर्व समस्यांचे मूळ हे वाढत्या लोकसंख्येतच आहे. झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे देशात अन्न, वस्त्र, निवारा, रोगराई आणि दारिद्र्य असे अनेक प्रश्न उदभवू लागले आहेत. विशेष म्हणजे देशाच्या प्रगतीत वाढती लोकसंख्या ही मोठा अडसर ठरत आहे. लोकसंख्या वाढीचा सर्व बाबींवर परिणाम होत असून विकासालाही खीळ बसत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील सर्व नागरिकांच्या मूलभूत गरजा भागवणेही सरकारला शक्य होत नाही. ही लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी शासनस्तरावरून पुरेसे प्रयत्नही केले जात आहेत. पण समाजातून अजूनही त्या प्रयत्नांना म्हणावी तशी साथ मिळत नाही. कुटुंब नियोजनाची मोहीम सरकारी पातळीवर प्रभावीपणे राबवली जात आहे ही दिलासा देणारी बाब असली तरी मुलगा व्हावा या हट्टापायी तीन ते चार अपत्यांना जन्म देणारे महाभागही समाजात आहेत. या आणि अशा लोकांमुळेच ही मोहीम वेग धरत नाही. लोकसंख्या नियंत्रणात आणायची असेल तर नव्या पिडीमध्ये लोकसंख्येविषयी योग्य दृष्टिकोन आणि जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी नव्या पीडिला लोकसंख्या शिक्षण दिले पाहिजे. अवघ्या २४ वर्षात जगाची लोकसंख्या पाच अब्जानी वाढली तर देशाची लोकसंख्या पंच्याहत्तर वर्षात ११० कोटींनी वाढली या वेगाने जर लोकसंख्या वाढत राहिली तर लोकसंख्येचा हा भार वसुंधरा पेलू शकणार नाही त्याचा परिणाम एकूणच मानवी जीवनावर काय होईल हे नव्या पीडिला समजावून सांगावे लागेल. देशातील लोकसंख्या जर नियंत्रणात आली नाही तर सर्वानाच अडचणींचा सामना करावा लागेल. आपण जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहोत. हे स्वप्न साकार करायचे असेल तर वाढत्या लोकसंख्येला आळा घालावाच लागेल हे नवीन पीडिला पटवून द्यावे लागेल. वाढत्या लोकसंख्येमुळे होणारे दुष्परिणाम, निर्माण होणाऱ्या समस्या याची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी यासाठी शाळा, महाविद्यालयांमध्ये चर्चासत्रांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करायला हवे. लोकसंख्या शिक्षण अप्रत्यक्ष सामाजिक शिक्षण आहे त्यामुळे केवळ तरुणांनाच नव्हे तर समाजालाही या शिक्षणाची गरज आहे. लोकसंख्या शिक्षण ही काळाची गरज आहे. लोकसंख्या वाढ रोखायची असेल, देशाला विकासाच्या मार्गावर न्यायचे असेल आणि देशाला महासत्ता बनवायचे असेल तर लोकसंख्या शिक्षणाला पर्याय नाही.

**– श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

### ऐका..

अंतर्मनात डोकवा
अंतरात्म्याचे ऐका
बोटांवर हवी शाई
मतदानाचाशिक्का

दुष्काळी भयाणता
उन्हाळा देई चटका
फुफाट्यात मतदान
कशी विचीत्रघटका

कुणी जाणे टाळेलं
मनी विचार थोटका
मत दान टाळताना
मतदार बने बुटका

उन्हे होतील सुसह्य
पहायची रे वाट का
नेते धाडतीलं गाडी
हवा मोठा थाट का

उन्हाळी लागेलं जर
बसे आपणा फटका
एका मते काय होई
विचारकसा फाटका

बाकी कष्ट विरतीलं
निर्धार करता पक्का
मतदान नक्की करू
द्यावा यंदास धक्का

– हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

## मोठे भोम गावात जन्मठेप या नाटकाचा ४२ वर्षांनी झाला यशस्वी दुसरा प्रयोग



**अक्षराज : संग्राम ठाकुर**

**दि.२५, उरण (रायगड) :** महाराष्ट्राला नाट्यकलेची मोठी परंपरा लाभली आहे, त्या परंपरेचे जतन उरण तालुक्यातील मोठे भोम हे गाव वर्षानुवर्ष करत आले आहे. या गावाला यशस्वी असा नाटय कलाकारांचा वारसा लाभला आहे, त्यामध्ये कै भाऊ ठाकुर, कै रघुनाथ पाटील, कै रामदास जोशी, चांगदेव जोशी, अरुण पाटील, रमेश पाटील, नकुल पाटील, सुनील पाटील, विजय केणी या कलाकारांनी अनेक वर्ष रंग देवतेची सेवा केली,

१९८२ रोजी महाराष्ट्राचा नटसम्राट अशी ओळख असलेले चिरनेर गावातील नटवर्य स्वर्गीय ना.ना.पाटील यांच्या दिग्दर्शनाखाली मोठे भोम गावात कमलाकर बोरकर लिखित जन्मठेप या अजरामर नाटकाचा प्रयोग झाला होता, त्या नाटकातील कलाकारांच्या भूमिका आजही नाट्यरसिकांच्या हुदयात घर करून आहेत. या नाटकाचा दुसरा प्रयोग परत व्हावा ही नाटय प्रेमींनी बऱ्याच वर्षापासूनची इच्छा होती, म्हणून या वर्षी झालेल्या श्री हनुमान जयंती निम्मित वसंत चिर्लेकर यांच्या प्रेरणेने आणि विजय केणी यांच्या दिग्दर्शनाखाली जन्मठेप या नाटकाचे यशस्वी असे सादरीकरण करण्यात आले, १९८२ साली झालेल्या प्रयोगात विजय केणी यांनी लक्ष्मण या पात्राची अजरामर अशी भूमिका केली होती, तर कै भाऊ ठाकूर यांनी अजरामर केलेल्या राम या पात्राची भूमिका त्यांचे सुपुत्र संग्राम ठाकुर यांनी यशस्वी रित्या पार पाडली. १९८२ साली जन्मठेप ही नाट्य कलाकृती सादर केलेल्या सर्व कलाकारांचा विशेष सन्मान करण्यात आला. या वर्षी झालेल्या जन्मठेप या नाटय प्रयोगात शाम च्या भूमिकेत अनंत पाटील, लक्ष्मण च्या भूमिकेत चंद्रशेखर पाटील, रावसाहेब च्या भूमिकेत सुनील पाटील, राम च्या भूमिकेत संग्राम ठाकुर, पाटील च्या भूमिकेत ज्ञानेश्वर पाटील, भास्कर च्या भूमिकेत निलेश पाटील, सदा च्या भूमिकेत आशुतोष पाटील आणि राधा च्या भूमिकेत कळंबोली येथील गौतमी घरत या सर्व कलाकारांनी आपल्या अभिनयाचा ठसा नाट्य रसिकांच्या मनावर उमटवून अधिराज्य केले. या नाटकाला अभिजीत पाटील, शाम पाटील आणि रोहन पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले असून नेपथ्य चंद्रशेखर पाटील आणि भगवान पाटील, तर प्रकाश योजना हरेश पाटील, प्रकाश योजना संयोजक राजेंद्र जोशी(पेण), पार्श्व संगीत मनोहर फुंडेकर आणि निलेश ठाकूर(चिरनेर), रंगभूषा नंदकुमार चिरनेरकर, संगीत गणेश घरत(धा.जुई), तबला साथ निषाद चिर्लेकर यांनी सर्वांनी आपापली जबाबदारी योग्य रित्या पार पडली. ग्रामस्थ मंडळ मोठे भोम यांनी या नाटकाची निर्मिती केली असून गावातील प्रतिष्ठित लोकांनी सहनिर्माता म्हणून घनःश्याम पाटील, समीर नारंगीकर, किशोर केणी, नवनीत नारंगीकर, दिलीप पाटील, बबन पाटील, तुषार पाटील यांनी मोलाचे सहकार्य केले, तर श्री हनुमान नाट्य मंडळ मोठे भोम यांनी हा प्रयोग यशस्वी रित्या सादर केला.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# दुरुस्तीच्या कामात अडथळा ठरणारे बस्थानक, सौचालय पाडल्याने प्रवाशांची गैरसोय

**अक्षराज : राजू गागरे**

**दि.२५, झरी :** मुकूटबन येथे राज्य मार्गावर रस्ता दुरुस्ती व रूंदीकरणाचे काम सुरू आहे. रस्ता दुरुस्ती कंत्राट यवतमाळ येथील कंत्राटदारास मिळाला असून राज्य मार्गावरील रस्ता दुरुस्ती सह रूंदीकरणा सह नाली बांधकाम केले जात आहे. हे करीत असतांना दुरुस्ती च्या कामात अडथळा ठरणारे अनेक दुकाने बस्थानक सौचालय जेसीबीच्या साहाय्याने पाडण्यात आले आहे.

मागील काही दिवसांपासून मुकूटबन येथे सुरू असलेल्या राज्य मार्गावरील रस्ता दुरुस्तीच्या कामाला वेग आला असून कामात अडथळा ठरणारे बस्थानक, सौचालय, काही व्यवसाय कर्ते यांची दुकाने पाडण्यात आले. विषेश म्हणजे मुकूटबन मार्केटमध्ये शाळकरी विद्यार्थी महिला पुरुष यांची नेहमीच वर्दळ असते. सौचालय पाडल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. बाजार वाडी केडील गार्डन मध्ये एका सौचालयाची व्यवस्था आहे मात्र अनेक प्रवाशांना नागरिकांना माहिती नसल्याने भटकंती होऊन गैरसोय होत असल्याचे चित्र आहे.

# मराठा आरक्षण सर्व्हे केलेल्या कर्मचाऱ्यांची फसवणूक..

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.२५, मुंबई :** मोठा गवगवा करून राज्य सरकारने २४ फेब्रुवारी ते २ मार्च या कालावधीत महाराष्ट्रातील गावागावात व मोठमोठ्या शहरात कुणबी मराठा आरक्षण सर्व्हेक्षण कार्यक्रम राबविला. या सर्व्हेसाठी सरकारी शाळा व शाळेतील विद्यार्थ्यांना ऐन परीक्षेच्या काळात वाऱ्यावर सोडून जबरदस्तीने पन्नास टक्के शिक्षकांना सर्व्हे क्षणासाठी आदेश काढले होते.

सर्व्हेक्षण करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याला कामाच्या मोबदल्यात सरसकट दहा हजार रुपये मानधन देण्यात येईल असे जाहीर केले होते. पण काल अचानक एक यादी मुंबई महापालिका क्षेत्रात प्रसारित करण्यात आली असून त्या यादीत हे सर्व्हेक्षण करणाऱ्या सर्व शिक्षक, इंजिनियर, वैद्यकीय कर्मचारी यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम सरकारने केल्याचे दिसून आले आहे.

यामध्ये प्रगणक म्हणून उन्हातान्हात घरोघरी जाऊन लोकांचे बोलणे, टोमणे खाऊन इमानेइतबारे काम करणाऱ्या प्रगणकाना त्यांनी केलेल्या कामाच्या प्रमाणात पैसे देणार असल्याचे जाहीर केले आहे.या सर्व्हेसाठी गेलेल्या काही शिक्षक व कर्मचाऱ्यांना लोकांचा मार खावा लागला होता. काही जणांना धमक्या दिल्या होत्या. काहींना सोसायटीच्या आवारातून अपमानजनक शब्द वापरून हाकलून दिले होते. तरीही शिक्षक बिचारा कोणाला काहीही प्रत्युत्तर न देता आपले काम निष्ठेने करत राहिला.

त्यात सर्व्हेक्षण करण्यासाठी घालून दिलेली वेळ ठिकाण आणि प्रगणक शिक्षकांचे राहण्याचे ठिकाण यांचा कुठेही ताळमेळ बसत नव्हता. सेंट्रल लाईन च्या लोकांना वेस्टर्न लाईनवर तर वेस्टर्न लाईनवरच्या लोकांना हार्बर लाईनवर ड्युटी चे आदेश देण्यात आले होते. तरीही कोणीही कसलीही तक्रार न करता वा कसलेही आढेवेढे न घेता प्रमाणिकपणे आपले काम केले.

या कामाचा मोबदला प्रत्येकी दहा हजार रुपये देण्यात येईल असे सरकारने अगोदरच जाहीर केले होते..पण कशाचं काय अन फटक्यात पाय....! या उक्तीप्रमाणे सरकारने या सर्व्हेक्षण प्रगणक व पर्यवेक्षकांना देण्यात येणाऱ्या मानधनाची यादी जाहीर केली आहे. ज्यामध्ये समान काम करून कोणाला एक हजार रुपये तर कोणाला तीन हजार,चार हजार,सात हजार रुपये असे वेगवेगळे मानधन जाहीर केले आहे. जाहीर केल्याप्रमाणे कोणालाही दहा हजार रुपये मानधन देण्यात आलेले नाही.ही बाब अत्यंत निंदनीय व आश्चर्यकारक आहे.

सरकारी आदेशाचा बडगा म्हणून ज्या ज्या शिक्षक व इंजिनियर तसेच वैद्यकीय अधिकारी कर्मचाऱ्यांनी निमूटपणे सर्व्हेक्षण कार्य केले त्या सर्वांमध्ये हे तोकडे व फसवे मानधन बघून रोष निर्माण झाला आहे. सरकारने सुरुवातीला जाहीर केलेले दहा हजार रुपये मानधन जर या प्रगणकांना सरसकट नाही दिले तर रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येईल असे कर्मचाऱ्यांनी जाहीर केले आहे.

# राहुरी विद्यापीठ परिसरात मतदार जागृती अभियान

**अक्षराज : सत्यम भोसले**

**दि.२४, राहुरी (अ.नगर) :** राहुरी विद्यापीठ परिसरात मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी राहुरी तहसीलदार कार्यालयाच्या स्वीप मतकर जनजागृती अभियान समितीच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात आले. सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील नवमतदारांची नावनोंदणी पूर्ण करून त्यांना मतदानाची शपथ देण्यात आली. विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर, चतुर्थश्रेणी कर्मचारी यांनी मतदान करण्याचा संकल्प केला. यावेळी मतदार जनजागृती गीताचे गायन करून १०० टक्के मतदानाचा प्रचार करण्यात आला. विद्यापीठातील सर्व कर्मचारी व प्राध्यापक यांनी मतदानासाठी आग्रही रहावे म्हणून कुलसचिव आनंदकर यांची स्वीप समितीने भेट घेतली. त्यानंतर आनंदकर यांनी अधिनस्त सर्व विद्यापीठातील शास्त्रज्ञ, प्राध्यापक व कर्मचारी यांना सहकुटुंब मतदान करावे, अशी सक्ती केली.

परिसरातील मतदारांच्या स्वीप समिती सदस्यांनी गृहभेटी घेऊन मतदानासाठी आवाहन केले. या जनजागृती कार्यक्रमात स्वीप नोडल अधिकारी गटशिक्षणाधिकारी मोहिनीराज तुंबारे, शिक्षणमंडळाचे सचिव महानंद माने, प्राचार्य अरुण तुपविहिरे व उपप्राचार्य बाळासाहेब डोंगरे यांनी महत्वाची भूमिका बजावली. स्वीप समन्वयक विस्तार अधिकारी सिनारे व सातपुते यावेळी उपस्थित होत्या.

# हातभर तक्रारींचा, बोटभर उपाय सेल्फी स्टँडला नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद




**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२५ ठाणे :** देशभरात लोकसभा निवडणूकीचे पडघम वाजत असताना ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात मतदार जनजागृती सेल्फी स्टँडच्या माध्यमातून केली जात असून त्याला नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

नागरिकांना मतदानासाठी प्रवृत्त करण्यासाठी हातभर तक्रारींचा, बोटभर उपाय असा जनजागृती करणारा सेल्फी स्टँड लावण्यात आला असून या जिल्हाधिकारी कार्यालयात येणारे नागरिक या ठिकाणी सेल्फी घेत आहेत. 'उत्सव निवडणूकीचा अभिमान देशाचा', 'मतदार राजा ठेव कर्तव्यांचे भान', 'सशक्त लोकशाहीसाठी कर मतदान' असे आवाहन सेल्फी स्टँडच्या माध्यमातून जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी नागरिकांना केले आहे. लोकशाहीच्या उत्सवात सर्व मतदारांनी सक्रिय सहभाग घेऊन मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे यासाठी ठाणे जिल्ह्यातील नागरिकांमध्ये जनजागृतीवर विविध उपक्रम राबविण्यात येत असून त्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातील हा सेल्फी स्टँड लोकांचे लक्ष वेधून घेत आहे.'तुमचे मत तुमचा अधिकार', 'वृद्ध असो जवान'सर्वजण करा मतदान,'तुमचे मत खरा आधार लोकशाहीचा' आदी घोषवाक्यांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.जिल्हा निवडणूक कार्यालयाकडून लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रियेत मतदारांचा सहभाग वाढविण्यासाठी स्वीपअंतर्गत मतदार जागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात आलेल्या या सेल्फी स्टँडवर मतदारांना ऑफलाईन माहितीसाठी मतदार मदत क्रमांक देण्यात आला आहे. नागरिकांनी या सेल्फी स्टँडचा लाभ घेऊन मतदान प्रक्रियेत स्वतः सहभागी व्हावे व आपल्या परिसरातील नागरिकांनाही मतदानासाठी प्रवृत्त करावे असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे.

# नवी मुंबई नेरूळ आरटीओ परिसरात अतिक्रमणावर बुलडोझर



**अक्षराज : गणेश जाधव**

**दि.२५, नेरूळ (नवी मुंबई) :** आज दुपारी अचानक नेरूळ येथील परिवहन कार्यालयाजवळील जागेवर असलेले अतिक्रमण हटवण्यासाठी सिडको. महानगरपालिका. पोलीस प्रशासन मोठ्या फौजफाट्यासह बुलडोझर घेऊन हजर झाले व अतिक्रमण हटवण्याचे काम मोठ्या धुमधडाक्यात पार पाडले.

अशा प्रकारे कडक कारवाई होणे गरजेचे आहे अशी सामान्य नागरिकांच्या मनातून दबक्या आवाजात भावना व्यक्त होत होत्या. अशी कार्यतत्परता प्रशासनाने कोणताही भेदभाव न दाखवता सरसकट करावी. अशी ही जनतेची दबक्या आवाजात चर्चा चालू होती. प्रशासनाने या जनतेच्या दबक्या आवाजाचे रहश्य ओळखावे.

# समाधानकारक भाव नसल्याने कांदा साठवणुकीला वेग



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, पारनेर (अ.नगर) :** यंदाच्या वर्षी थंडीचे प्रमाण कमी राहिल्याने व उष्णतेचे प्रमाण अधिक असल्याने कांद्याच्या साईज वर विपरीत परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. अवकाळी पावसामुळे तालुक्यातील टाकळीढोकेश्वर परिसरातील वडगाव सावताळ, वासुंदे, खडकवाडी, वनकुटे, ढवळपूरी, भाळवणी, कान्हुरपठार, आदिंसह अनेक गावात कांद्याच्या काढणीला वेग आला आहे. कांदा काढण्यासाठी इतर गावातील मजूर कांदा उत्पादकाच्या शेतात दाखल झाले आहेत हे मजूर प्रति एकर १२ ते १३ हजार रुपये याप्रमाणे कांदा पीक काढण्याची मजुरी घेत आहेत.

सध्या मजुरांना ४०० ते ५०० रुपये मजुरी शेतकऱ्याला द्यावी लागत आहे. बहुतांश ठिकाणी कांदा काढणी पूर्ण झालेली असून कांदा शेतातच अरणी करून साठवल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. मात्र सध्या कांद्याला समाधानकारक बाजार भाव नसल्याने शेतकऱ्यांमधून नाराजीचा सूर उमटत आहे.

काढणी केलेल्या कांदा साठवणुकीकडे शेतकऱ्यांचा कल असल्याचे दिसून येत आहे. कांदा रोप उपलब्ध करण्यापासून ते लागवड, खुरपणी, भरणी, औषधे फवारणी, आदींपासून ते काढणीपर्यंत मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांचा खर्च होतो. त्यातच समाधानकारक बाजार भाव मिळाला नाही तर खर्च निघत नसल्याचे खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केले. त्यामुळे कांदा साठवणुकीला वेग आला आहे. कांद्याला हमीभाव देण्याची मागणी कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

**आगामी काळात दर मिळाल्यास शेतकऱ्यांचा फायदा**

यंदा तीन ते चार एकरां वर रब्बी कांद्याची डिसेंबर, जानेवारी महिन्यामध्ये लागवड केली होती. जवळपास चार महिन्यांनी कांदा काढणीला आला आहे सध्या तालुक्यात अवकाळी पाऊस अनेक ठिकाणी होत आहे त्यामुळे सध्या कांदा काढण्यासाठी १२ ते १३ हजार रुपये दर चालू आहे. आगामी काळात कांद्याला चांगला दर मिळाल्यास काही प्रमाणात शेतकऱ्यांना फायदा होईल.

**– दिनेश चौधरी, गणेश चौधरी (कांदा उत्पादक शेतकरी, ढवळपूरी)**

# वासुदेवरूपात केली दरेगाव वणी येथे मतदानाची जनजागृती



**अक्षराज : दिपक शिवले**

**दि.२५, कळवण :** कळवण तालुक्यातील दरेगाव वणी येथे स्वीप उपक्रमाअंतर्गत मतदान मतदार जनजागृती मोहिम यशस्वीरीत्या संपन्न झाली यावेळी शाळेचे अवलीया शिक्षक राजेंद्र जाधव यांनी वासुदेवरुपात आकर्षक अशी वेशभुषा करत हातात चिपळ्या, टाळ घेवून स्वरचित गाण्यातून मतदारांना मतदानाचे महत्व पटवून दिले. आजही ग्रामीण भागात वासुदेव या कलाकाराविषयी नितांतआदर , मान-सन्मानआहे. त्यांच्या जागरणाचा जनता आजही लाभ घेत असते. हेच औचित्य साधत राजेंद्र जाधव सर यांनी लोकशाहीचा, आपल्या राज्यघटनेचा सन्मान वाढविण्यासाठी आपले अमूल्य मत किती महत्वाचे स्पष्ट केले. घटनेने दिलेला मतदानाचा मुलभुत हक्क आपण बजावलाच पाहिजे. कोणत्याही प्रलोभनांना बळी न पडता , धर्मनिरपेक्ष भावनेने , निर्भिडपणे मतदान करावे. शिवाय एका चांगल्या उमेदवाराला आपण मतदान करुन निवडून दिल्यामुळे परिसराचा , आपल्या गावाचा विकास निश्चितच होवू शकतो. आपले अनमोल मत म्हणजे भारतमातेला मत असेही त्यांनी नमुद केले. प्रत्यक्ष गावातील प्रत्येक घरोघरी जावून मतदाराला मतदानाचे महत्व पटवून देण्यात आले यामुळे मतदानाच्या टक्केवारीत निश्चितच वाढ होईल अशी अपेक्षा आहे. यावेळी शाळेचे शिक्षक सुनिल पवार, प्रकाश भोये , अंगणवाडी सेविका मिनाबाई कुवर , मदतनिस रत्नाबाई कुवर , मोहनदरी ग्रुप ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक , शिपाई सुरेशभाऊ गावातील जेष्ठ - श्रेष्ठ ग्रामस्थ, माजी सरपंच धनराज राऊत, ग्रामपंचातीचे सदस्य, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष गुलाब कुवर सर्व सदस्य गण उपस्थित होते.

# मतदानासाठी कर्मचारी मतदान केंद्राकडे रवाना

## देगलूर बिलोलीसाठी ६०० पोलीस कर्मचारी तैनात



**अक्षराज : अब्दुल मुबिन**

**दि.२५, देगलूर (नांदेड) :** नांदेड लोकसभा मतदारसंघासाठीच्या निवडणुकीसाठी देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघात ३४८ मतदान केंद्रावर मतदान होणार असून आज सकाळपासून महामंडळाच्या ३८ बसेस व अन्य खाजगी वाहनाद्वारे कर्मचारी रवाना झाले आहेत.३४८ मतदान केंद्रासाठी एक उपविभागीय पोलीस अधिकारी, २८ पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षक,४९९ पोलीस कर्मचारी २७९ होमगार्ड हे तैनात करण्यात आले असून यांच्यासह ५९७ पोलीस कर्मचाऱ्यांची मतदान केंद्रावर नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व मतदान केंद्रासाठी मतदान केंद्राध्यक्ष व त्यांचे सहाय्यक व पोलीस टीमची नियुक्ती करण्यात आली असून शुक्रवारी दोन्ही तालुक्यातील सर्व मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.

देगलूर बिलोली तालुक्यातील मतदान केंद्रासाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान प्रक्रियेसंबंधी नियुक्त करण्यात आलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना महत्त्वाच्या सूचना देऊन मतदानासाठी लागणारे सर्व साहित्य नियुक्त केलेल्या टीमकडे सुपूर्द करण्यात आले. ३९ झोनल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदान केंद्राच्या ठिकाणी थंड पाणी, मतदान केंद्रालगत सावलीची सोय करण्यात आली असून संवेदनशील व अति संवेदनशील मतदान केंद्राच्या ठिकाणी सीसीटिव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत.

आज ईव्हीएम मशीन व इतर साहित्याचे वाटप करण्यात आले असून यावेळी कर्मचाऱ्यांची आरोग्याची काळजी घेण्यासाठी वेगळ्या कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन गिरी यांनी केंद्राध्यक्ष व झोनल अधिकारी यांची वेगळी बैठक घेऊन सर्वत्र शांततेत मतदान प्रक्रिया पूर्ण करण्यासंबंधी महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. यावेळी पोलीस उपअधीक्षक संकेत गोसावी, बिलोलीचे तहसीलदार श्रीकांत निळे, नायब तहसीलदार संजय नागमवाड, देगलूरचे गटविकास अधिकारी शेखर देशमुख, बिलोलीचे गटविकास अधिकारीश्रीनिवास पदमावार यांच्यासह पोलीस अधिकारी व यंत्रणेतील प्रमुख अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# वाचा आणि समृद्ध व्हा...

खरं म्हणजे मी ज्या वेळेपासून ग्रंथ वाचनाला सुरुवात केली तेव्हापासून माझ्या मनात ग्रंथाबद्दल आदराचे स्थान आहे. आपण म्हणतो ग्रंथ हे गुरु आहेत, ग्रंथ हे मित्र आहेत आणि ग्रंथ प्रेरणास्थान आहेत, ग्रंथ हे मार्गदर्शक आहे, ग्रंथ हे आधार आहे. वाचाल तर वाचाल. आजपर्यंत मी तो अनुभव घेतला आहे अजूनही घेत आहे.रोज काही वाचन झाले नाही तर बेचैन वाटते.

माझ्या आजूबाजूला असंख्य पुस्तके असतात आणि त्याशिवाय मला बरे वाटत नाही. काय असेल ते असो पण सुरुवातीपासून जी काही पुस्तके माझ्याजवळ येत गेली ही पुस्तके घेत गेलो ती पुस्तके वाचून व्यवस्थित ठेवण्याची सवयच लागली होती ती आजपर्यंत कायम आहे.

आता सत्तरी कडे वाटचाल करत असतांना मागे वळून बघितले तर मला आठवतं तिथपासून म्हणजे अगदी शालेय जीवनापासूनच मला ग्रंथ वाचनाची अर्थात पुस्तकाची खूप आवड. त्यावेळेला पाचवी-सहावीच्या वर्गामध्ये दर आठवड्याला एका वारी पुस्तकाची पेटी वर्गात आणली जात होती आणि मुलांना वाचण्यासाठी पुस्तके दिली जात होती. आठवडाभरात वाचून ती पुस्तक पेटी परत येईल तेव्हा बदलून मिळत होती. त्या पेटीचा वार मी कधीच चुकवला नाही. प्रत्येक वेळेला नवीन पुस्तक वाचायला मिळेल असे बघत होतो. त्यानंतर थोडा वरच्या वर्गात गेल्यानंतर दहावी अकरावीत शाळेच्या वाचनालयातून पुस्तके दिली जात होती. त्यावेळेला पुस्तकाचा प्रकार बदलून जात होता. वयात बदल झाल्यामुळे वाचनाची आकलन शक्ति वाढल्यामुळे वेगवेगळ्या प्रकारातील

पुस्तके तिथे मिळत होती. म्हणजेच जसे कथासंग्रह, कादंबरी, ललित लेख,चरित्र,आत्मचरित्र,एकांकिका,नाटके, कवितासंग्रह

असे सगळे पुस्तके होती. त्यातून आपण निवड करायची मला शक्यतो चरित्र, आत्मचरित्र, आणि लेख संग्रह तसेच एकांकिका,कविता, वगैरे वाचायची आवड होती.

पुढे कॉलेजमध्ये गेल्यानंतर कॉलेजचेही वाचनालय समृद्ध होत. खूप निरनिराळ्या प्रकाराची पुस्तक त्या ठिकाणी वाचायला मिळत होती. अनेक साहित्यिक मासिक वाचण्यात येत होती सत्यकथा, प्रतिष्ठान, ललित, अस्मितादर्श, वैखरी, युगवाणी, साहित्य विषयक मासिक तिथे वाचायला मिळाली. तसेच अनेक प्रकारचे लेखसंग्रह, नाटक, वाचली गेलीत. आम्हाला आवडलेले ग्रंथ ही मागवायला सांगत होतो. वाचत असतानाच मग मी हळूहळू लिखाणाकडे वळलो. त्यावेळेला थोड्याच कविता, काही कथा, वर्तमानपत्रातून लेख लिहू लागलो. एक ग्रुप तयार झाला आणि मग आम्ही दरमहा हस्तलिखित मासिक काढले. त्यानंतर आंतरदेशीय पत्रावर( लिटिल मँगेझीन ) कविता छापून त्या मर्यादित लोकांपर्यंत पोहोचवल्या. कॉलेजमध्ये एकांकिका नाटक वाचल्यामुळे कॉलेज गॅदरिंग मध्ये अशा एकांकिकांचा प्रयोग करण्याची ईच्छा पूर्ण करता आली. कॉलेजमध्ये आमचा मुला मुलींचा एक ग्रुप तयार होऊन मग दरवर्षी एकांकिका बसवण्याचा उपक्रम सुरू झाला. म्हणजे वाचन आणि वाचनातून एकीकडे अभिनय असे झाले. करता करता मग आम्ही राज्य नाट्य स्पर्धेतही भाग घेतला त्यात अभिनयाचे पारितोषिक मिळाले. पुढे बापट, करंदीकर, पाडगावकर, यांच्यासोबत कविता वाचन करण्याचा ही संधी मिळाली. वाचनामुळे मी अनेक कार्यक्रमांचे जवळ गेलो. साहित्य मंडळ, लोकहितवादी मंडळ, सन्मित्र नाट्य मंडळ, त्यातूनच मग कधी कविता स्पर्धा कथा स्पर्धा एकांकिका स्पर्धा

यांचे आयोजन केले. कॉलेज शिक्षण संपल्यानंतरही वाचनाची आवड कायमच होती. आणि पुस्तकमैत्री कायम होती.प्रवासाला जरी गेलो तरी माझ्या बॅगमध्ये एखादे पुस्तक, कवितेचा संग्रह, किंवा एखादा दिवाळी अंक असायचा. अजूनही ती सवय कायम आहे. वाचन आणि मग वाचनातून लिखाण अशी ती प्रक्रिया सुरू झाली. अर्थातच आपण जेवढ वाचन करू तेवढी समृद्धी आपल्यात येते हे नक्कीच. पुढे नोकरी लागल्यानंतर महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने नवलेखक शिबिर, बोर्डी, तालुका डहाणू येथे आयोजित केले होते.त्यात माझी निवड झाली होती. जवळपास दहा दिवस आम्ही त्या बोर्डीच्या समुद्रकिनाऱ्यावर निसर्ग रम्य वातावरणात होतो. त्यावेळेला लिखाणा संबंधी अनेक वक्त्यांची भाषण, चर्चा झाली. त्यात दिनकर गांगल, कुमार केतकर, अरुण साधू, नारायण सुर्वे, अशोक जी परांजपे, बाळ सामंत, अनंत भावे, उमकांत ठोंबरे,ही सारी लेखक मंडळी होती. जवळपास ४० नवलेखक. त्यात अरुण म्हात्रे, डॉक्टर विश्वेश्वर सावदेकर, नीला लिमये, सुरेखा जोशी, संजय कुलकर्णी, वीणा उर्सेकर,सुभाष घोरपडे, अशी काही नावे आठवतात. त्यातूनच पुढे ग्रंथाली वाचक चळवळीशी संबंध आला. गांगल, केतकर, साधू, ही सर्व मंडळी ग्रंथाली वाचक चळवळीत होती. पुस्तकाची आणि वाचनाची आवड असल्यामुळे मी त्या चळवळीकडे ओढला गेलो आणि मग ग्रंथालीचे केंद्र सुरू केले. त्यामुळे अनेक पुस्तकांच्या संपर्कात मी आलो आणि निरनिराळ्या विषयावरची पुस्तके वाचायला मिळाली. वाचनाचा पुरेपूर आनंद लुटला असेच म्हणावे लागेल. नंतर पुस्तक प्रदर्शन भरवणे हा एक भाग होता. अनेक प्रकाशनाची आणि ग्रंथालीची पुस्तके अशी प्रदर्शने भरवली. वाचकांना ती खरेदीसाठी उपलब्ध करून दिली. अशा प्रकारे खूप पुस्तके समोर बघून वाचक हरवून जात होते. हे पुस्तक घ्यावे ? का ते पुस्तक घ्यावे ? असा प्रश्न त्यांना पडायचा. त्यांच्या चेहऱ्याचे भाव मी बऱ्याचदा बघितले आहे. निरनिराळ्या विषयां वरिल. अनेक लेखकांची पुस्तके,पुस्तकांचे आकर्षक मुखपृष्ठ, बघून वाचक हरवून जात होते. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद बघून मलाही समाधान व्हायचे. ग्रंथ मोहोळ सारखा असा कार्यक्रम आयोजित केला होता त्यात माझा सहभाग होता. महाराष्ट्रात एकाच वेळी एकाच दिवशी ५० ठिकाणी पुस्तकाचे प्रदर्शन भरवण्यात आली होती. सोबतच काही मान्यवर लेखक, कवी, चित्रकार, हे सुद्धा होते. विजय तेंडुलकर यांची संवाद यात्रा, लहान मुलांसाठी पुस्तकाचे प्रदर्शन बाल झुंबड, हा सुद्धा आयोजित केला होता. केवळ वाचनातून हे सर्व शक्य झाले होते आणि वाचनामुळेच ग्रंथांलीशी नाते जोडले गेले होते. त्या माध्यमातून वाचनापर्यंत पुस्तके पोहोचण्याचे कार्य माझ्याकडून माझ्याकडून झाले.

त्याच सुमारास मी एका अध्यात्मिक कार्यक्रमाला हजेरी लावली होती.मी त्या कडे ओढलो गेलो. त्यानंतर काही अध्यात्मिक पुस्तके वाचली. त्यातूनच आम्हाला सद्गुरूंची प्राप्ती झाली. अनुग्रह घेतल्यानंतर खूप सारी आध्यात्मिक ग्रंथ वाचले. त्यातूनही खूप आनंद तर मिळालाच पण पण जीवनाचा मार्ग सुखकर कसा होईल याचे ज्ञान प्राप्त झाले.जीवनात येणाऱ्या कठीण प्रसंगी, दुःखाचे प्रसंगी तरुन जाण्याची शक्ती. बळ मिळाले. स्वामी शिवानंद सरस्वती, सद्गुरु ओम मालतीआई, गोंदवलेकर महाराज, रामकृष्ण क्षीरसागर महाराज, शंकर महाराज, कलावती आई, मुक्ताबाई, जगन्नाथ काका कुंटे, दत्ता भैया महाराज, यांचे अनेक ग्रंथ वाचले.संक्षिप्त दासबोध वाचला.संत साहित्य वाचले, त्यांनीही खूप आनंद दिला. सुख म्हणजे काय ,? आनंद, समाधान,कशात आहे.जीवनाला एक वेगळे वळण मिळाले. पुढे ऋषिकेश ला स्वामी शिवानंद स्वामींच्या च्या आश्रमात जाणे झाले. आजूबाजूचे ऋषिकेश, हरिद्वार, मसूरी ,मथुरा, वृंदावन, आग्रा ,असा प्रवास झाला.

धार्मिक, सामाजिक, राजकीय,ऐतिहासिक, , वैचारिक, शेतकऱ्यांचे संबंधित ग्रंथ वाचले. त्यात अनेक लेखकांचा समावेश आहे. यादी केली तर खूपच मोठी होईल. म्हणून थोडक्यात अशी पुस्तके वाचल्यामुळे अनेक विषय डोळ्या समोर आले. त्यात शेतकऱ्यांचे प्रश्न,व्यथा, काही सामाजिक प्रश्न काही राजकारणाविषयी असे अनेक प्रकारे लेखन माझ्या हातून झाले मी केले. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आणि होणाऱ्या आत्महत्यांच्या संदर्भात ई. टी.व्ही मराठीवर माझी दोन भागात दीर्घ मुलाखत राजू परुळेकर यांनी घेतली होती. त्या माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्याची संधी मिळाली. ते प्रश्न सर्वांपर्यंत पोहोचवले गेलेत. त्या मुलाखतीनंतर संपूर्ण महाराष्ट्रातून खूप मोठ्या प्रतिक्रिया आल्या. अनेकांनी फोन करून मला स्पष्टपणे विषय मांडल्याबद्दल अभिनंदन केले. अशा प्रकारे ही एक माझ्या आयुष्यातील ग्रंथांनी दिलेली खूप महत्त्वाची आणि आनंददायी गोष्ट आहे.तावडीबोली साहित्य संमेलनात तावडीरत्न म्हणून पद्मश्री कवी ना.धों महानोरांचे हस्ते सत्कार केला.

केवळ पुस्तकांचे वाचनच नाही तर त्या पुस्तकाचे व्यवस्थितपणे जतनही केले पाहिजे. मला सुरुवातीपासूनच ग्रंथ व्यवस्थितपणे ठेवण्याची आवड आहे. आज माझ्याकडे भरपूर ग्रंथ उपलब्ध आहे .अनेक ग्रंथप्रदर्शनात मी घेतले आहेत. प्रदर्शनात गेल्यानंतर आवडले ते ग्रंथ बाजूला घ्यायचे , त्यातूनही आपल्या बजेट प्रमाणे त्यावेळी ग्रंथ खरेदी करत होतो. पुढच्या वेळेला कोणते घ्यायची तेही ठरवून घेत होतो. माझ्याकडे जवळपास दोन गोदरेजची कपाट भरून आणि वरती खूप ग्रंथ आहेत. घेतल्यानंतर ते व्यवस्थितपणे ठेवणे हे सुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे. या ग्रंथांना आपण आपल्या आयुष्यात आदराचे स्थान देतो, गुरुस्थानी मानतो, मित्र म्हणतो,. मार्गदर्शक म्हणतो, प्रेरणाचे स्त्रोत म्हणतो, सुखदुःखात सोबती म्हणतो, नक्कीच ते व्यवस्थित ठेवणे तितकेच महत्त्वाचे आहे. माझ्या जवळची पुस्तके कपाटात प्रत्येक कप्प्यात चार चार गड्डया असे लावून ठेवले आहे. त्या प्रत्येकाची या पुस्तकांची यादी एका डायरीत केली आहे. म्हणजे एखादे पुस्तक जर आपल्याला हवे असल्यास ते ताबडतोब सापडू शकते. ती माझी सवयच आहे. म्हणून मी कोणाला पुस्तक हवे असल्यास ताबडतोब देऊ शकतो. थोडक्यात वाचनालयात जशी पुस्तके लावली असतात त्याचप्रकारे ते पुस्तक अवघ्या पाच मिनिटात देऊ शकतो.आता बऱ्याच कार्यक्रमात मी एखादा ग्रंथच भेट देत असतो.

अनेक प्रकारचे ग्रंथ वाचनातून अनेक विषय डोळ्यासमोर येत असत. शेतके शेतकऱ्या विषयी पुस्तके सामाजिक प्रश्न, तसेच धार्मिक आपल्या रुढी, परंपरा, विषयी वाचन झाले. त्यातूनच मग त्या प्रश्नावर विचार करून लिखाण झाले. शेतकऱ्यांच्या अनेक समस्या व्यथा यावर लिखाण केले सामाजिक समस्या वरही लेखन झाले त्यातूनच पुढे मी माझे स्वतःचे दोन लेख संग्रह प्रसिद्ध केले त्यालाही वाचकांवर प्रतिसाद मिळाला. स्वातंत्र्याची अमृतगाथा या त्रिखंडात्मक संदर्भ ग्रंथात ग्राहक संरक्षण या विषयावर लिहिलेल्या लेखाला स्थान दिले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सर्वच क्षेत्रात झालेल्या प्रगतीचा आढावा या तीन खंडात घेतलेला आहे.

आता अनेक लेखकांची पुस्तके माझ्याकडे येत असतात आणि मला जमेल तसे त्याचे वाचन करून मी त्याच्यावर लिहीत असतो.

सुधा मुर्ती- गोष्टी माणसांच्या,वाइज अँड अदरवाइज. किरण बेदी-व्हॉट वेंट रॉंग, मजल दरमजल.,अनिल अवचट संभ्रम, कार्यमग्न, माणसं,समिधा-साधनाताई आमटे. पु.ल.देशपांडे यांची अनेक पुस्तके, दुर्गा भागवत-पैस,ऋतुचक्र,डूब. आनंद यादव-स्पर्शकमळे,गोतावळा, आणि ईतर. दया पवार-बलुत. नरेंद्र जाधव-आमचा बाप आणिआम्ही. व.पु.काळे, सावरकर-माझी जन्मठेप, लज्जा-तस्लिमा नसरीम.प्रकाशवाटा-प्रकाश आमटे.एम. एस.स्वामीनाथन यांचे भुकमुक्तीचा ध्यास,शरद जोशी, अनेक चरित्र,आत्मचरित्र, कविता संग्रह,ऐतिहासिक, विज्ञान आरोग्य विषयी डॉं आनंद नाडकर्णिंचे-वैद्यकसत्ता,आरोग्याचा अर्थ,डॉ. अरुण लिमये-लाखमोलाचा जीव, क्लोरोफॉर्म. डॉं लीना मोहाडीकर, विठ्ठल प्रभू वाचले..शामचीआई वाचले. खानोलकर, महानोर,ग्रेस,तेंडुलकर, अत्रे,रणजित देसाई, ना.स.ईनामदार, शिवाजीराव सावंत. यांचे साहित्य वाचले.यादी मोठी आहे.

ग्रंथ वाचनातून आणि वाचनाच्या आवडीने आतापर्यंत मी अनेक गोष्टी साध्य करू शकलो.

ग्रंथांनी मला आनंदच दिला. आनंदाच्या प्रसंगी वाचनातून तो द्वीगुणीत झाला. मनाची अस्वस्थता असते त्यावेळेला वाचनातून ती दूर झाल्याचाही अनुभव आहे.ग्रंथ वाचन खरोखरच आनंद प्रेरणेचा स्त्रोतच आहे. समर्थ रामदास स्वामींनी कितीतरी वर्षापूर्वी लिहिले आहे.. दिसा माजी काहीतरी लिहावे.. प्रसंगी अखंडित वाचीत जावे.. आपण सतत आणि सातत्याने वाचायला हवे आणि त्याचे चिंतन आणि मननही करायला हवे. त्यातूनच विचाराची बैठक तयार होते आणि एक सर्वांग सुंदर साहित्यकृती निर्माण होत असते.वाचन महत्त्वाचे.. म्हणून ग्रंथाना जवळ करा.

माझ्या आयुष्यात ग्रंथांना अतिशय आदराचे स्थान आहे. आजही माझ्या भोवती ग्रंथच असतात. त्याशिवाय मला करमत नाही. असेच काही आहे.

- दिलीप देशपांडे.
जामनेर, जि.जळगांव.
मोबा.८९९९५६६९१७

# २७ एप्रिल पासून होणार नालेसफाईला सुरुवात

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२५, ठाणे :** ठाणे महापालिकेने यंदा पावसाळ्यापूर्वी नालेसफाईची कामे वेळेत व्हावी. यासाठी आधीच पावले उचलली होती. त्यानुसार निविदा प्रक्रिया ही राबविण्यात आली. परंतु प्रतिसाद मिळत नसल्याने वारंवार मुदतवाढ दिली गेली. तरीही निविदेला आवश्यक प्रतिसाद मिळाला नसल्याने निवेदेतील अटी शर्ती शिथील केल्याने अखेर आता दिवा प्रभाग समिती वगळता उर्वरित ८ प्रभाग समितीमध्ये ठेकेदार पुढे आल्याने आता येत्या शनिवार, दिनांक २७ एप्रिल पासून नालेसफाईच्या कामांना सुरूवात होणार असल्याची माहिती महापालिकेने दिली. यंदा पालिकेने मार्च महिन्यातच नालेसफाईच्या कामांच्या ९ प्रभाग समिती निहाय निविदा काढल्या होत्या.



महापालिकेने टाकलेल्या काही अटी शर्तींमुळे ठेकेदारांनी याकडे पाठ फिरवल्याचे दिसून आले. तसेच यंदा खर्चात देखील ३ कोटींची कपात केली होती. त्यामुळे देखील ठेकेदारांनी नकार घंटा वाजवली होती. त्यामुळे वारंवार निविदेला मुदतवाढ दिली. त्यानंतर वागळे इस्टेट आणि लोकमान्य नगर याठिकाणी ठेकेदारांनी निविदा भरल्याचे दिसून आले. त्यानंतर महापालिकेने पुन्हा निविदेला मुदतवाढ देत २२ एप्रिल पर्यंत वाढविली होती.

ही मुदतवाढ देत असताना निविदेत असलेली आपत्कालीन परिस्थितीत वर्षभर नालेसफाई करण्याची अट शिथिल करण्यात आल्याने अखेर दिवा प्रभाग समिती वगळता उर्वरित ८ प्रभाग समितींना ठेकेदार मिळाले आहेत.

त्यानुसार येत्या शनिवार, दिनांक २७ एप्रिल पासून नालेसफाईच्या कामांना सुरुवात होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

# झाप गावात जंगी कुस्त्यांच आयोजन; मॅक्स ड्रायव्हरचं आखाड्यात वर्चस्व

**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.२५, जव्हार (पालघर) :** जव्हार तालुक्यातील बहुचर्चित झाप ग्रामपंचायत येथे हनुमान जयंती निमित्त बुधवारी जंगी कुसत्यांचं आयोजन केले होते. यात कौलाळे ग्रामपंचायत पैकी फणसपाडा गावातील अंकुश दिघा याने तब्बल दोन कुस्त्या जिंकून मैदानावर आपली हुकूमत कायम ठेवली. दरम्यान महाराष्ट्रातीलच नव्हे तर जगात लोकप्रिय असलेला खेळ म्हणजे कुस्ती. हा खेळ फार पूर्वीपासून खेळला जातो. मैदानी खेळ म्हणून कुस्तीची ओळख आहे. यात चपळता व निर्णय क्षमता या गोष्टी खुप महत्वाच्या आहेत. तसेच धोबी पछाड, गदालोट असे वेगवेगळे डाव देखिल आहेत. २४ एप्रिल रोजी हनुमान जयंतीचं औचित्य साधुन जव्हार पैकी झाप येथे कुस्त्यांचं आयोजन केलं होतं. सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत पैलवानांना आपलं कौशल्य दाखवन्यासाठी मैदान खुलं केलं होतं. दिवस भरात २३६ कुस्त्या पार पडल्या. यावेळी पालघर जिल्ह्यातील अनेक पैलवानांनी आपली हजेरी लावली होती. विशेष म्हणजे ड्राव्हरकिचं काम करणारा जव्हार तालुक्यातील फणसपाडा येथील अंकुश दिघा याने शेवटची कुस्ती २:४५ वाजता मारून मैदानात पुन्हा एकदा कौलाळे ग्रामपंचायतच नाव रोशन केलं. तो शेतकरी कुटूंबातून येतो. फावल्यावेळात जव्हार-झाप मार्गावर ड्रायव्हींगचं काम सुद्धा करतो. मी गेली चार वर्षांपासुन कुस्ती खेळतोय. आमच्या गावातील जेष्ठ पैलवान किसन भोरे यांच्याकडे कुस्ती शिकतोय. तसेच



बुधवारी झालेल्या कुस्तीत समोरच्या पैलवाणावर बांगडी डाव टाकून त्याला धुळीत लोळवले आणि एकुन दोन कुस्त्या मारून तब्बल तिन हजार रूपये, शाल व दोन श्रीफल जिंकले असे अंकुश याने आमच्याशी बोलतांना सांगितलं. त्याने सलग दोन वर्ष मानाची कुस्ती जिंकून आपला दबदबा कायम ठेवला तर सुधाकर वळे यांनी ५ हजाराची बिनजोड कुस्ती मारली.

सदर स्पर्धेचं आयोजन हे झाप ग्रामपंचायतीचे सरपंच एकनाथ दरोडा, सदस्य महेंद्र गवारी, सखाराम वड उपसरपंच, ग्रामस्थ सुधाकर वळे, नामदेव गवारी, रमेश वळे, ईश्वर बरतन, ईश्वर खरूले, सुनील घाटाळ, देवराम गवारी पोलिस पाटील यांनी केले होते. पुढच्या वर्षी गावचे जिल्हा परीषद शिक्षक दिघायांच्याकडूनप्रत्येकी अडीच हजाराच्या एकुन चार, तर एकनाथ दरोडा व नांदगावचे देहाडे बाबा यांच्याकडून५ हजार ५०० पंचावन्न रूपयाची प्रत्येकी एक बक्षिस ठेवले आहे. असे सरपंच दरोडा यांनी दुरध्वनीने आम्हाला सांगितले. यास्तव पुढल्या वर्षी बक्षिसांची खैरात असल्यामुळे नक्कीच पैलवानांनी आखाडा गजबजुन जाईल यात दुमत नाही.

# कोतवाली पोलिसांच मोठी कारवाई ! दहा लाखांचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५,अहमदनगर :** गोवंशीय जनावरांची वाहतुक करणाऱ्याला कोतवाली पोलिसांनी गजाआड केले आहे. त्याच्याकडून १० लाख ३९ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ३९ जिवंत गोवंशीय वासरांची सुटका करण्यात आली आहे. मोसिम मुस्ताक कुरेशी (वय- ४० वर्ष रा. बेपारी मोहल्ला झेंडीगेट, अहमदनगर) असे त्याचे नाव आहे. अधिक माहिती अशी की पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना केडगाव बायपास येथे आयशर टेंम्पोने गोवंशीय जनावरांची वाहतुक करत असल्याची खात्रीशिर बातमी मिळाली.

मिळालेल्या माहिती प्रमाणे पो.नि प्रताप दराडे यांनी गुन्हे शोध पथकातील अधिकारी व अंमलदार यांना कारवाई करण्याबाबत आदेशित केले. पथकाने सापळा रचत आयशर टेंम्पो क्रमांक (एम. एच ०४ जे यू २१०१) येताच त्यास थांबवुन टेंम्पोची पाहणी केली असता, त्याचे टैम्पोमध्ये गोवंशीय जातीचे काळे पांढरे रंगाचे वासरे दिसुन आले. याबाबत चौकशी केली असता त्याने सदरची गोवंशीय ही मी समीर शेख (रा कसाई मोहल्ला, सुपा, अहमदनगर) यांचे मालकीचे असुन ते झेंडीगेट येथे कत्तलीकरीता घेऊन जात असल्याचे सांगितले. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधिक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, गुन्हे शोध पथकाचे सपोनि योगीता कोकाटे, पोहेकॉ शाहीद शेख, पाहेकॉ ए पी इनामदार, पोना अविनाश वाकचौरे, मपोना संगिता बडे, पोकों सत्यजित शिंदे, पोकों तानाजी पवार, पोकों सुरज कदम, पोकों अतुल काजळे, पोकॉ दिपक रोहोकले, पोकॉ सचिन लोळगे, पोकों ढाकणे यांच्या पथकाने केली आहे.

# दिंडोरी लोकसभेच्या उमेदवार मालती थवील यांची संवाद भेट..

**अक्षराज : निवृत्ती शिंदे**

**दि.२५, नांदगाव (नाशिक) :** नांदगाव तालुक्यात वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब बोरकर यांच्या नेतृत्वात दिंडोरी लोकसभा मतदारसंघातील वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार मालती शंकर थविल यांनी नांदगाव मतदारसंघातील जनता व कार्यकर्त्यांशी संवाद भेट घेत संवाद साधला. थविल यांनी नांदगाव मतदार संघातील कार्यकर्त्यांशी संवाद साधताना खासदार म्हणून मला संधी मिळाल्यास लोकसभा मतदारसंघातील जनतेचे प्रश्न




सोडविण्याचे तसेच, गोरगरीब जनतेसाठी, शेतकऱ्यांसाठी अहोरात्र काम करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी तालुक्यातील वंचित आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर नांदगाव मतदार संघात थविल यांची पहिलीच भेट होती. यावेळी वंचितचे पदाधिकारी व तालुका अध्यक्षांच्या वतीने मालती थवील यांना भरघोस मतांनी विजय मिळवून देण्याचे, मतदार संघातील जनता आपल्या पाठीशी असल्याचे आश्वासित करण्यात आले, मतदारसंघातील जनतेला थवील यांना मतदान करण्याचे आव्हान वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आले.